<u>**नियमीत दिवाणी दावा क्रं. २६७/२०१७ मधील नि.क्रं. ११ खालील आदेश**</u>

वादी यांनी सदरचा दावा कायम मनाईकरीता दाखल केला आहे.

**०२.** प्रतिवादी क्रं.१ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ (ब)व (क) प्रमाणे दावा नामंजूर करावा यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी यांनी सदर कामी दावा दुरुस्तीचा अर्ज दाखल करुन दावेत दुरुस्ती केली आहे. त्याप्रमाणे त्यांनी दरम्यानची उत्पन्नाची आणि अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जाची मागणी केली आहे. परंतु वादीनी त्याबाबत महाराष्ट कोर्ट फी ॲक्ट मधील तरतुदीप्रमाणे मुद्रांक शुल्क लावलेला नाही.

**०३.** वादी यांनी दावा कलम ९ मध्ये दाव्याच्या दिलेला तपशिल चुकीचा आहे. वादीनी मिळकतीचा कब्जा देणेची मागणी केली असल्याने त्या मिळकतीचे मुल्यावर आकारणी करुन मुद्रांक शुल्क अदा करणे आवश्यक आहे. परंतु वादीनी योग्य तो मुद्रांक शुल्क लावलेला नसलेने वादीचा दावा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे चालणेस पात्र नाही. त्यामुळे वादीचा दावा खर्चासह नामंजूर करावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

**०४.** वादी यांनी दावा कलम 'इ' ते 'उ' मध्ये मागीतलेली कोणतीही दाद मिळणेस वादी पात्र नाहीत. वादीनी सदर दादी बाबत महाराष्ट्र कोर्ट फी ॲक्ट मधील

तरतुदीप्रमाणे कोर्ट फी लावलेशिवाय सदरची दाद मागणेचा कोणताही अधिकार नाही. तसेच वादीनी दरम्यानचे उत्पन्नाची कोणतीही आकारणी याकामी केलेली नाही. तसेच वादीनी कब्जाचीही मागणी केली असलेने महाराष्ट्र कोर्ट फी अॅक्ट मधील कलम ६(व्ही) प्रमाणे आकारणी करणे आवश्यक आहे. परंतु तशी आकारणी वादीनी केली नसल्याने वादीचा दावा खर्चासह नामंजूर करणेत यावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

**०५.** वादी यांनी सदर अर्जास त्यांचे म्हणणे सदर अर्जाच्या पाठीमागे दाखल केले आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या सदर अर्जातील कथने खोटी, लबाडीची, चुकीची व कोर्टाची दिशाभुल करणारी अशी आहेत त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. वादी यांनी दावा दाखल करताना योग्य तो मुद्रांक शुल्क जोडलेले होते. त्यानंतर वादीने दाव्यामध्ये दुरुस्ती मागितलेली होती. दुरुस्त दाव्याप्रमाणे व कोर्टाचे आदेशाप्रमाणे जादाचा मुद्रांक शुल्क वादी यांनी नि. ५५ च्या पुरसिसीसोबत दि. २१.०९.२०१८ रोजी योग्य व आवश्यक मुद्रांक शुल्क जोडलेला आहे. त्यामुळे वादींना पुन्हा जादा मुद्रांक शुल्क जोडणेचा प्रश्नच येत नाही. त्यामुळे प्रतिवादी यांचा सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

**०६.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी प्रतिवादी यांची सदर अर्जातील कथने खोडून काढणेसाठी त्यांचे म्हणणे सदर अर्जाच्या पाठीमागे दाखल केले आहे. त्यामध्ये त्यांनी दावा दाखल करताना योग्य ती मुद्रांक शुल्क भरला असल्याचे कथन केले आहे. तर दावा दुरुस्त केल्या नंतर त्यांनी कोर्ट आदेशा प्रमाणे

रक्कम रु. २००/- चा मुद्रांक शुल्क नि.५१ वरील अर्जाप्रमाणे भरला आहे. त्यामुळे वादी यांच्या दाव्यातील विनंतीमध्ये जी वादीने मागणी केली आहे त्या मागणीच्या अनुषंगाने दाव्याचा मुद्रांक शुल्क भरल्याचे दिसून येते. त्यामुळे वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

Digitally signed by V. A. Lavand-Kokate
Date: 2023.09.01 17:00:38 +0530

V. A. Lavand-Kokate

( व्ही.ए.लावंड–कोकाटे )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कळे–खेरीवडे.

कळे–खेरीवडे
दि.०१.०९.२०२३.